अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.अतिमअ(ज)/साप्रवि/आस्था-४/ ७९३०
दिनांक : ११/०१/२०२१.

## -: कार्यालयीन परिपत्रक :-

विषय : पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजुर करणेबाबत.

संदर्भ : १. अति. महा. आयुक्त (वि) कार्यालय, जा. क्र. अतिमआ(वि)/उआसे/१५९० दि.२९/०६/२०१३.
२.मा. अति. महापालिका आयुक्त (ज) यांचे ठराव क्र.१/८४० दिनांक ३०/१२/२०१५
३. अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(ज)/उआसाप्र/आस्था/५११० दिनांक ३०/१२/२०१५.
४. मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.१/४५४ दिनांक १६/१२/२०२०

पुणे महानगरपलिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना विषयांकित योजनेचे लाभ संदर्भ क्र. १ अन्वये अनुज्ञेय केलेले आहेत, याबाबत वेळोवेळी सुधारित आदेश/परिपत्रके प्रसृत केलेले आहेत. पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ अंमलबजावणीचे म्हणजेच दि.०४/०९/२०१४ या शासन राजपत्र दिनांकानंतर विविध पदांच्या शैक्षणिक अर्हता सुधारित झालेल्या आहेत.

त्यानुषंगाने दि.०४/०९/२०१४ या शासन राजपत्र दिनांकापूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजूर करणेचे कार्यवाहीबाबत संदर्भ क्र. २ चे मान्यते नुसार संदर्भ क्र. ३ अन्वये कार्यालय परिपत्रक प्रसृत करण्यात आले होते, सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करणेबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभाग प्रमुख यांनी उपरोक्त मंजुरीप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

Rubal 11/1/2021

( रुबल अग्रवाल )
अतिरिक्त महापालिका आयुक्त ( ज )
पुणे महानगरपालिका

प्रत : सर्व संबंधित खातेप्रमुख/विभाग प्रमुख,
पुणे महानगरपालिका

यांजकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी --

अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
आस्थापना विभाग, पुणे महापालिका,
जावक क्र. : अतिमआ(ज)/उआसाप्र/आस्था/ ४९९०
दिनांक : ३०/१२/२०१५

## कार्यालय परिपत्रक

**विषय : मनपा सेवकांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ :** १) जावक क्रमांक अतिमआ (वि)/उआसे/१५९० दि.२९/०६/२०१३
२) जावक क्रमांक अतिमआ(ज)/उआसे/३२४५, दि. २०/०९/२०१३
३) जा.क्र.अतिमआ/उआ/से/ ४४०३ दि.१२/११/२०१४ , उआ/से/४७७० दि.२६/११/२०१४ चे कार्यालय परिपत्रक
४) मा. अति. महापालिका आयुक्त ठ.क्र.११८४०दिनांक ३०।१२। २०१५.

पुणे मनपा सेवकांना सुधारित अश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजूर करणेबाबत संदर्भ क्र. १ व २ अन्वये कार्यालय परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे. मे. महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामध्ये एकूण पद संख्या निश्चित करण्यात आलेली असून, पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ मध्ये पद भरण्याचे प्रकार सरळसेवा, पदोन्नतीचे पद, संवर्ग, सुधारित पदनाम आणि अर्हता इ. मे.महाराष्ट्र शासनाकडून निश्चित करून देण्यात आले आहेत. सदर नियमावलीची अंमलबजावणी **शासन राजपत्रात** प्रसिध्दीचे दिनांकापासून करावयाची असल्याने दिनांक ०४/०९/२०१४ आणि तद्नंतर ज्या सेवकांची एकाच पदावर/वेतन श्रेणीमध्ये १२ किंवा २४ वर्षांची सेवा पूर्ण झाली आहे, अशा सेवकांचे सुधारित अश्वासित प्रगती योजनेनुसार लाभ मान्यतेचे प्रकरणी कशा प्रकारे कार्यवाही करावी याविषयी निर्णय घेणे आवश्यक झाल्याने संदर्भ क्र. ३ चे कार्यालय परिपत्रकान्वये विषयांकित प्रकरणांवर कार्यवाही तात्पुरती थांबविण्यात आली होती, त्याअनुषंगाने आता खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१) पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ **शासन राजपत्रात** प्रसिध्दीचा दिनांक ०४/०९/२०१४ पूर्वी पुणे महानगरपालिका सेवेत नेमणूक झालेल्या सेवकांना सुधारित अश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ मंजूर करताना, त्यांना पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ अंमलबजावणी दिनांका पुर्वीचे शैक्षणिक अर्हते प्रमाणे पहिला/दुसरा लाभ मंजूर करावा,

२) कोणत्याही संवर्गातील पदांचे पदोन्नतीचे शिडी (Ladder) मध्ये पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ नुसार बदल झालेला असला, तरी सेवाप्रवेश नियम मंजूरी पूर्वीची पदांची बढतीचे/एकाकी/बढती नसलेले अशी जी वर्गवारी असेल त्या प्रमाणेच आणि सेवा प्रवेश

नियम मंजूरी पूर्वीचे विहित शैक्षणिक अर्हतेनुसार सुधारित अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मान्य करणेची विहित कार्यवाही करावी,

३) पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ अंमलबजवणीचा दिनांक ०४/०९/२०१४ आणि त्यानंतर जे सेवक महानगरपालिका सेवेत नव्याने सेवाप्रवेश करतील त्यांना अश्वासित प्रगती योजनेचे लाभांसाठी पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ प्रमाणे सुधारित अर्हता धारण करावी लागेल.

४) पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ मंजूरी पूर्वीची शैक्षणिक अर्हता हि केवळ दिनांक ०४/०९/२०१४ पूर्वी महानगरपालिका सेवेत प्रवेश केलेल्या सेवकांना सुधारित अश्वासित प्रगती योजनेचे लाभ मंजूरीचे प्रकरणी वैध राहिल, प्रत्यक्ष पदोन्नतीसाठी पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकण) नियम २०१४ अन्वये विहित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहिल,

तरी वरील प्रमाणे संबंधित खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२९/१२

(राजेंद्र जगताप)
**अति. माहापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रत/
सर्व मा. खाते प्रमुख
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित–

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त (सा.प्र.)**
पुणे महानगरपालिका